**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 25.04.2025** **वार-शुक्रवार**

---

**पत्रकार परिषद**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या वतीनं मुंबई इथं वेव्हज अर्थात जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषदेचं आयोजन येत्या 1 ते 4 मे दरम्यान करण्यात आलं आहे. ही परिषद मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर बीकेसी याठिकाणी होणार असल्याची माहिती आकाशवाणीच्या अभियांत्रिकी विभागाचे उपमहासंचालक अधीर गडपाले यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली, यावेळी आकाशवाणी पुणे केंद्राच्या वृत्त विभागाचे सहाय्यक संचालक माधव जायभाये उपस्थित होते. माहिती आणि प्रसारण मंत्रालय तसंच प्रसार भारती यांचा आयोजनात मुख्य सहभाग आहे. चित्रपट, संगीत, ओ टी टी, ऑनलाईन गेमिंग, व्ही एफ एक्स, ॲनिमेशन या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन देणे, विविध देशातील निर्मात्यांना एकत्र आणणे, भारतात गुंतवणूक वाढवणे हा या परिषदेचा उद्देश आहे.

**पवार**

कुटुंब कल्याण भवन इथं आयोजित राज्य कुटुंब कल्याण भवन आणि प्रशिक्षण केंद्र इमारत भूमिपूजन आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत राज्यातल्या नवीन 43 आपला दवाखान्यांचं

लोकार्पण आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झालं.  निरोगी नागरिक हाच राज्याच्या प्रगतीचा पाया असून, आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासोबतच सर्वांगीण निरोगी महाराष्ट्र घडवण्यासाठी राज्यशासन कटिबद्ध असून यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

**भारती विद्यापीठ**

सह्याद्री देवराई आणि भारती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील पहिल्या दोन दिवसीय बीज संमेलनातील हरित संपत्तीचं दालन या प्रदर्शनाचं उद्घाटन आज भारती विद्यापीठ हेल्थ सायन्सेसच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप यांच्या हस्ते झालं. हे प्रदर्शन भारती विद्यापीठाच्या धनकवडी शैक्षणिक संकुलात दोन दिवस खुलं असणार आहे. या प्रदर्शनात देवराईची संक्षिप्त प्रतिकृती, विविध कडधान्य आणि पालेभाज्यांच्या बियांचं प्रदर्शन, विविध वनस्पतींची बीज रोपं बघायला मिळणार आहेत. या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश राज्यातील शाळा आणि महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना निसर्ग आणि पर्यावरणाची गोडी लावणे, त्यांना केवळ भाषण न देता कृतिशील सहभाग घ्यायला लावणे. तसेच आपल्या झाडांची आणि बियांची ओळख करून देणे, ती झाडं वाढवण्यासाठी त्यांच्या देखभालीसाठी विद्यार्थ्यांसोबत सक्रिय राहणे हा असल्याचं सयाजी शिंदे यांनी यावेळी सांगितलं.

**महावितरण**

महावितरणच्या पुणे परिमंडलातील वीजग्राहकांना एप्रिल आणि मे महिन्याच्या वीजबिलांसोबत सुरक्षा ठेवीची अतिरिक्त रक्कमेची स्वतंत्र बिल

देण्यात येत आहे. या सुरक्षा ठेवीची अतिरिक्त रक्कम वीजग्राहकांनी भरण्याचं आवाहन महावितरण ने केलं आहे. ही रक्कम भरण्यासाठी सहा समान मासिक हप्त्यांची सोय उपलब्ध करून दिली आहे. घरबसल्या महावितरण च्या संकेतस्थळावरुन आणि मोबाइल ॲप वरुन ही रक्कम भरता येणार असल्याचं महावितरणकडून कळवण्यात आलं आहे.

**जलपर्णी**

छत्रपती शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील येरवडा, बोपोडी भागात मुळा-मुठा नदीत झालेल्या जलपर्णी हटवण्यासाठी आमदार शिरोळे यांनी महापालिकेचे पर्यावरण संवर्धन अधिकारी मंगेश दिघे यांच्या सह बैठक घेतली. जलपर्णी हटवण्यासाठी 15 मार्च ला ठेकेदार नेमण्यात आले आहेत. त्या ठेकेदारांमार्फत भाऊ पाटील रोड एकता सोसायटी आणि येरवडा इथं फोफावलेली जलपर्णी तातडीनं हटवली जाईल, असं आश्वासन महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांना दिलं.

**निदर्शन**

पहलगाम मध्ये झालेल्या दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्यात निरपराध पर्यटकांची हत्या करण्यात आली. या निर्दयी भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ प्रभात तरुण मित्र मंडळ आणि डेक्कन जिमखाना नागरिक मंच च्या वतीनं कमला नेहरू पार्क, प्रभात रस्ता इथं तीव्र निदर्शनं करण्यात आली.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी आणि संकलन विभागामार्फत शहरातील मालमत्ता कर थकबाकीदारांना जप्तीपूर्वीची अंतिम

नोटीस बजावण्यात आली आहे. मार्च 2025 पूर्वीची मालमत्ता कर बिलाची थकबाकी असणाऱ्या नागरिकांना नोटीस प्राप्त झाल्यानंतर 7 दिवसांची अंतिम मुदत देण्यात येणार आहे. या कालावधीत मालमत्ता कर न भरल्यास किंवा समाधानकारक कारण न दाखवल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता संबंधित मालमत्तेवर थेट जप्तीची आणि कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली जाईल. असं सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितलं.

**क्रिकेट**

**a**पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने वॉरीयर्स करंडक' या 15 वर्षांखालील मुलींच्या आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. हि स्पर्धा 28 एप्रिल ते 7 मे  या कालावधीमध्ये फुरसुंगी मधल्या वॉरीयर्स क्रिकेट मैदानावर रंगणार आहे. लहान वयात मुलींना व्यावसायिक आणि स्पर्धात्मक खेळाचा सराव व्हावा, या उद्देशाने ही स्पर्धा होणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 40 तर किमान तापमान 24 पूर्णांक   दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमानात बदल संभवत नसल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**